ता/क/१४

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग.
मादाम कामा मार्ग .हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई.०३२ ४००-

दूरध्वनी क्रमांक :- २२०२३३६१ Email ID :gadproto-mh@nic.in

क्र.टिआरएस २०२४/प्र.क्र.७७/राशि-१ दिनांक : २८ मार्च, २०२४

प्रति,

Dy. Commissioner of Police,
Protection,
मुंबई.

**विषय:** Providing accommodation and transport for the SPG teams

**संदर्भ:** आपले पत्र क्र. VVIP No. ११-०४/DCP/Prot/२०२४, दि. २७.०३.२०२४

महोदय,

भारताचे मा. पंतप्रधान महोदय यांच्या दि. १ एप्रिल, २०२४ रोजीच्या मुंबई दौ-याच्या अनुषंगाने SPG यांची राहण्याची व वाहनव्यवस्था या विभागामार्फ़त करणेबाबत आपल्या संदर्भाधिन पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

२. याबाबत नमूद करण्यात येते की, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दि. ३१ जानेवारी, १९९१ अन्वये अति अति महत्वाच्या दौ-याप्रसंगी कोणत्या विभागाने काय करावे याबाबतची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. ( प्रत संलग्न ) त्यानुसार संरक्षणाबाबतची व्यवस्था करण्याची जबाबदारी गृह विभागाशी संबंधित आहे.

३. SPG यांच्याकडे मा. पंतप्रधान यांना ( Close Proximate ) जवळची सुरक्षा पुरविण्याचे काम सोपविण्यात आलेले आहे. शासन पत्र क्र. टिआरएस १२८९/३०, दिनांक १८ सप्टेंबर, १९८९ अन्वये सुरक्षिततेच्या संबंधी संपुर्ण व्यवस्था पोलीस अधिका-यांकडे असते. राजशिष्टाचार विभागाकडून केवळ Carcade मधील वाहने पुरविण्यात येतात.

४. राजशिष्टाचार विभागाकडून यापुर्वी कधीही SPG यांच्या राहण्याची व वाहनांची व्यवस्था करण्यात आलेली नाही. मुंबईतील मतदान कार्यक्रम दि. २० मे, २०२४ रोजी आहे. त्यादरम्यान सुरक्षाविषयक महत्त्वाच्या अनेक मान्यवरांचा मुंबईत दौरा अपेक्षित आहे. ही बाब विचारात घेता, सुरक्षा विषयक अधिकारी व कर्मचा-यांच्या तसेच प्रस्तुत प्रकरणी SPG करीता निवास व वाहनांची व्यवस्थेबाबत आपणांकडून कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

**(मिलिंद हरदास)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

सहपत्र : वरीलप्रमाणे.